मूल्य ₹ १५/-

हसती दुनिया

(मराठी)

अंक ०८ • वर्ष १९ वे • पृष्ठे ५२ • ऑगस्ट - २०२२



हसती दुनिया

(मराठी)

अंक ०८ • वर्ष १९ वे • पृष्ठे ५२ • ऑगस्ट - २०२२

बालकांच्या बौध्दिक आणि आध्यात्मिक विकासाची आगळी वेगळी भेट

(पंजाबी, इंग्रजी व हिंदी भाषेतसुध्दा प्रकाशित)

संपादक
राजेंद्र थोरात
(अवैतनिक)

सजावट व चित्रे
स्वप्निल वि. ऱ्हाटवळ
राजनंदन कृ. पिंपळकर • श्रीकांत द. पाटील

संत निरंकारी मंडळ (चेंबूर) करिता मुद्रक व प्रकाशक श्री. चंद्रकांत अनंत जाधव यांनी ही हसती दुनिया पत्रिका संतोष प्रिंटर्स, जय शिवाजी नगर, कात्रक रोड, बेस्ट डेपो, वडाळा, मुंबई- ४०००३१, येथे छापून संत निरंकारी भवन, ५० मोरबाग रोड, दादर (पूर्व), मुंबई -४०० ०१४. येथे प्रकाशित केली.

कार्यालयाचा पत्ता
५०, मोरबाग रोड, संत निरंकारी सत्संग भवन,
दादर, मुंबई - ४०० ०१४
ई-मेल : marathihastiduniya@gmail.com
Website : www.nirankari.org

लेखकांच्या मताशी सहमत असणे अनिवार्य नाही

देश	1 वर्ष	3 वर्ष	5 वर्ष	11 वर्ष
भारत/नेपाळ	₹ 150	₹ 400	₹ 700	₹ 1500
यू.के.	£ 15	£ 40	£ 70	£ 150
यूरोप	€ 20	€ 55	€ 95	€ 200
अमेरिका	$ 25	$ 70	$ 120	$ 250
कॅनडा/ऑस्ट्रेलिया	$ 30	$ 85	$ 140	$ 300

मासिक पत्रिकेविषयी चौकशीसाठी हेल्प लाईन : ०२२-२४१० ५७४९

स्तंभ

- दोन शब्द ०४
- आरोग्याचा मंत्र ०९
- विचारपुष्प १०
- दादाला विचारु या १३
- शब्दकोडे १४
- वैज्ञानिक प्रश्नोत्तरे १५
- दिव्यवाणी २७
- वाढदिवसाच्या शुभेच्छा २६
- हसा मुलांनो हसा ३०
- सामान्य ज्ञान ४७
- चित्र काढा आणि रंग भरा ५०

चित्रकथा

- आजोबा १६
- किट्टी ३८

विशेष व प्रेरक प्रसंग

- व्यक्तिविशेष ०७
- तेजस्विनी २२
- भ्रमंती ३२
- समर्थ दर्शन -भाग ८८ ३४
- संतकथा ४२
- स्वामी विवेकानंद : प्रेरक प्रसंग ४८
- पक्षीजगत ४९

कथा

- कथा देवकी मातेची ०५
- एकाचा आधार धरा ११
- देवाचा निर्णय २०
- एका बाणात दोन शिकार २३
- सत्याग्रही मोहन २४
- संस्कारांच महत्त्व ३६
- विचारपूर्वक कर्म करा ४४
- झाडूवाला राजा ४५

कविता

- शुद्ध निरोगी भारत घडवू ०८
- श्रावण सरी ४३

आपली किंमत

सुयश एका परीक्षेत नापास झाला. त्याला वर्गशिक्षक आधीच खूप रागावले होते. घरी आल्यावर त्याचे बाबाही त्याच्यावर रागावले. त्याच्या बरोबरचे सगळे मित्र पास झाले होते. ते आनंदात होते. त्यांचे आई–वडील सर्वांना पेढे वाटत होते. सुयश मात्र गुन्हेगारासारखा वावरत होता. त्याला कशातच रस वाटत नव्हता.

सुयशचे आजोबा त्याला जवळ घेत म्हणाले, "बेटा असा नाराज होऊ नकोस. जा चॉकलेट घेऊन ये." आजोबांनी खिशातून एक नोट काढून त्याच्या हातात देत म्हटले, "या नोटेची किंमत किती आहे?" तो म्हणाला, "पाच रुपये!" ती नोट परत घेत त्यांनी हाताने चुरगळली आणि त्याला विचारले, "आता या नोटेची किंमत किती आहे?" तो म्हणाला, "पाच रुपये!" आजोबांनी पुन्हा ती नोट हातात घेतली आणि मातीमध्ये टाकली. धुळीने माखलेली ती नोट त्याच्या हाती देत आजोबांनी पुन्हा विचारले, "आता या नोटेची किंमत किती आहे?" तो म्हणाला, "तरीही पाच रुपयेच आहे". त्यावर आजोबा म्हणाले, "बाळ! ही नोट चुरगळली, धुळीने माखली तरी तिचं मूल्य कमी झालं नाही. तुला तर केवळ एका परीक्षेत अपयश आलं म्हणून तू काही कुचकामी ठरत नाहीस. ज्या गोष्टींमध्ये तू मागे पडलास त्यातील कमतरता जर तू शोधून काढली आणि त्यामध्ये योग्य सुधारणा केलीस, तर पुढे तू नक्कीच यशस्वी होशील. एखाद्या गोष्टीत अपयश आले म्हणून आपली किंमत कमी होत नाही." आजोबांच्या प्रेमळ शब्दांनी त्याला धीर आला.

मित्रांनो, जीवनात तर प्रत्येक क्षणी आपल्याला परीक्षा द्यावी लागते. शिवरायांना देखील अनेक वेळा शत्रूपुढे माघार घ्यावी लागली. अनेक महापुरुषांनाही अनेकदा अपमानित व्हावं लागलं, निंदा–दुःख सहन करावं लागलं. शास्त्रज्ञांनाही प्रयोग करताना खूपदा अपयश आलं; परंतु सातत्याने प्रयत्न करुन त्यांनी यश संपादन केलं."

ईश्वराने आपल्याला हा अनमोल मनुष्यजन्म दिलेला आहे. अनेकदा काही अनपेक्षित घटना घडतात. आपल्या मनासारखं घडत नाही. खरं तर अशा गोष्टी मनाला आणि देहाला मजबूत करण्यासाठीच असतात, देह सत्कारणी लावण्यासाठी ईश्वर आपल्या जीवनात वारंवार संधी देत असतो. त्याचा आपण लाभ घेतला पाहिजे. थोड्याशा अपयशानं दुःखी होणं, नाराज होणं म्हणजे ईश्वराने दिलेल्या वरदानाचा हा अपमानच नाही का?

- राजेंद्र थोरात •••

पैसा आवश्यक आहे; पण पैसा म्हणजे सर्वस्व नव्हे.

पौराणिक कथासार

कथा देवकी मातेची

भगवान श्रीकृष्णांना जन्म देणारी माता देवकीला दुःख का भोगावं लागलं? तिच्या सातही पुत्रांचा मृत्यू तिच्या डोळ्यासमोर का झाला? त्यांना एकापाठोपाठ का मारुन टाकण्यात आलं? स्वतः भगवान कृष्णाने तिच्या पोटी जन्म घेतला, असे असूनही आपल्या मातेला ते तुरुंगातून मुक्त का करु शकले नाहीत? आपल्या भावंडांना का वाचवू शकले नाहीत? असे अनेक प्रश्न तुमच्या बालमनाला पडत असतील, नाही का?

यासाठी माता देवकीच्या पूर्वजन्माची कथा पाहू या. दक्ष प्रजापती यांना दोन सुंदर कन्या होत्या. एकीचं नाव दिती आणि दुसरी आदिती. दोघींचा विवाह कश्यप नावाच्या ऋषींशी झाला. दिती आणि आदिती यांनी आपल्या पतीची उत्तम सेवा केली. ऋषी कश्यप यांनी प्रसन्न होत आदितीला वरदान दिले. त्यामुळे तिला बारा पुत्र झाले. ते सद्‌गुणी

नरदेह हा ईश्वर प्राप्तीचं साधन आहे.

व परोपकारी होते त्यांना देवता म्हणत आणि आदितीला देवमाता म्हणत. त्यामध्ये इंद्र हा अतिशय तेजस्वी व पराक्रमी होता.

दितीने मात्र पतीची आज्ञा न मानता पुत्रप्राप्तीसाठी हट्ट धरला. ऋषी म्हणाले, योग्य वेळी तुला पुत्र होईल; परंतु तिने त्यांचे ऐकले नाही. त्यामुळे पुढे तिला जी मुलं झाली ती दुर्गुणी आणि राक्षसी प्रवृत्तीची होती. म्हणून त्यांना असुर म्हणू लागले. त्यापैकीच हिरण्यकश्यप व हिरण्याक्ष या तिच्या दोन दुष्ट पुत्रांना भगवान विष्णूंनी ठार मारले व इंद्राला स्वर्गाचा राजा बनवले.

ही गोष्ट दितीच्या मनाला खटकत होती. तिने पतीची सेवा करत त्यांना प्रसन्न करुन घेतले. आपल्याला पराक्रमी पुत्र व्हावा व त्याने इंद्राचा वध करावा असा वर ऋषींकडे मागितला. ऋषी कश्यप यांना हे ऐकून दुःख झाले; परंतु त्यांनी तिला वर देण्याचे वचन दिले होते. ऋषींनी तिला पुसंवन व्रत करायला सांगितले. ते म्हणाले, या व्रताने तुला जो पुत्र होईल तो इंद्राला ठार मारील; परंतु जर तू व्रत चुकलीस तर तुझे पुत्र इंद्राचे मित्र होतील. हे व्रत चालू असताना तू कोणालाही शाप द्यायचा नाही, असेही बजावले.

दितीला जर बलवान पुत्र झाला तर तो इंद्राला ठार मारेल आणि तिचा मुलगा स्वर्गाचा राजा होईल ह्या गोष्टीमुळे अदितीला इंद्राची काळजी वाटू लागली. तिने इंद्राला सांगितले की दितीच्या पोटी तुझा शत्रू जन्म घेतोय. तेव्हा कसेही करुन त्याचा बंदोबस्त कर. त्यावेळी इंद्राने सूक्ष्म रुप धारण करुन दितीच्या गर्भाचे सात तुकडे केले. ही गोष्ट जेव्हा दितीला समजली तेव्हा ती अत्यंत क्रोधित झाली. तिने ओळखले की आदितीच्या सांगण्यावरुन इंद्राने आपल्या गर्भाचे तुकडे तुकडे केले. रागाच्या भरात तिने आदितीला शाप दिला, की तुला देखील होणारे पुत्र एकापाठोपाठ मारले जातील आणि तुला तुरुंगात खितपत पडावे लागेल. ही शापवाणी ऐकून ऋषि कश्यप म्हणाले, दिती तू शाप देऊन तुझं व्रत मोडलंस. त्यामुळे तुला होणारे पुत्र इंद्राचे शत्रू न होता मित्र होतील; परंतु तुझा शाप मात्र आदितीला भोगावा लागणार.

द्वापार युगामध्ये जेव्हा आदिती मानवी देहात जन्म घेईल तेव्हा तो शाप पूर्ण होईल. याप्रमाणे द्वापार युगात आदिती कंसाची बहीण देवकी म्हणून जन्माला आली; परंतु आकाशवाणी झाली की देवकीच्या पोटी येणारा आठवा पुत्र कंसाचा नाश करील. म्हणून कंसाने देवकीला तुरुंगात टाकले आणि तिच्या होणाऱ्या प्रत्येक मुलाला जन्मताच ठार मारले.देवकी देवमाता असूनही हे सारे मागील जन्मात मिळालेल्या शापामुळे घडले. म्हणून माता देवकीला तुरुंगवास व पुत्र वियोगाचे दुःख भोगावे लागले.

थोडक्यात, केलेल्या कर्माचे फळ हे कुठल्या ना कुठल्या युगात येऊन भोगावेच लागते. म्हणून आपले कर्म नेहमी चांगले असावे.

❖❖❖

रवींद्रनाथ टागोर

(७ मे १८६१ - ७ ऑगस्ट १९४१)



रवींद्रनाथ टागोर ज्यांना गुरुदेव असे ही संबोधले जाते, हे चित्रकार, नाटककार, कादंबरीकार, बंगाली कवी, संगीतकार आणि समाजसुधारक होते. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात व २०व्या शतकाच्या प्रारंभी यांच्या कार्यामुळे बंगाली साहित्य व संगीतात आमूलाग्र बदल घडून आला.

अतिशय लोकप्रिय कविता असलेल्या गीतांजलीचे ते कवी होते, ज्याचे वर्णन अगदी संवेदनशील, ताजे आणि सुंदर कविता असे केले जाते. ते १९१३ मध्ये नोबेल पारितोषिक जिंकणारे जगातील पहिले गैर–युरोपियन आणि साहित्यातील पहिले गीतकार बनले.टागोरांच्या काव्यात्मक गाण्यांकडे अध्यात्मिक आणि पारंपारिक म्हणून पाहिले गेले

बंगाली साहित्यावर रवींद्रनाथांचा एवढा प्रभाव लक्षात आहे की, बंगाली साहित्याची रवींद्रपूर्व व रवींद्रोत्तर अशी विभागणी करण्यात येते. त्यांना कधीकधी बंगालचा बार्ड म्हणून संबोधले जाते. तसेच ते अत्यंत प्रतिष्ठित रॉयल एशियाटिक सोसायटीचे सदस्य होते.

कोलकात्याच्या पिराली ब्राह्मण कुटुंबात जन्म झालेल्या रवींद्रनाथांनी वयाच्या ८व्या वर्षी पहिली कविता लिहिली. वयाच्या १६व्या वर्षी त्यांनी 'भानुसिंह' या टोपणनावाने बऱ्याचशा कविता लिहिल्या. १८७७ पर्यंत त्यांनी त्यांच्या खऱ्या नावाने लघुकथा आणि नाटके प्रकाशित केली. एक मानवतावादी,सार्वभौमवादी, आंतरराष्ट्रीयवादी म्हणून त्यांनी ब्रिटिश राजवटीचा विरोध केला.

शांतिनिकेतनाची उभारणी, विस्तृत व उच्च दर्जाच्या साहित्याची निर्मिती व रवींद्रसंगीताचे सृजन हे रवींद्रनाथांचे प्रमुख जीवनकार्य होते. पारंपरिक शिक्षण केवळ पोपटपंची शिकवते या विचारातून शांतिनिकेतनाचा क्रांतिकारक प्रयोग त्यांनी राबवला.

रवींद्रनाथांनी रचलेली जन गण मन व आमार शोनार बांग्ला ह्या रचना अनुक्रमे भारत व बांग्लादेश यांची राष्ट्रगीते म्हणून स्वीकारण्यात आल्या आहेत. दोन राष्ट्रगीतांचे जनकत्व असलेले रवींद्रनाथ हे पृथ्वीवरील एकमेव कवी आहेत. श्रीलंकेचे राष्ट्रगीतही त्यांच्या साहित्यातून प्रेरणा घेऊन तयार झाले.

गुरुदेव रवींद्रनाथांनी ७ ऑगस्ट १९४१ रोजी कोलकात्यातील जोराशंका ठाकूर बाडी येथे देह ठेवला.

मोठेपणाची इच्छा हे अहंकार वाढीचं कारण आहे.

कविता

शुद्ध निरोगी भारत घडवू

आपण बदलून जगही बदलू
सुंदर आपली वसुंधरा बनवू
पर्यावरणाचा समतोल राखून
शुद्ध निरोगी भारत घडवू

शुद्ध हवेचे आम्ही चाहते
परी वृक्ष न लावती कधी कोणी
नकळत आपण सर्व रोगांना
रोजच घालतो खतपाणी

फुला फळांची बाग सजवू या
वना उपवनात वृक्ष लावू
पर्यावरणाचा संदेश पसरवूनी
शुद्ध निरोगी भारत घडवू

पायी चालुनी सशक्त बनूया
प्रदूषणाचा मार्ग अडवूया
हात मागावर पिशवी बनवूनी
प्लास्टिक थैलीचा नाद सोडूया

पाणी म्हणजे जीवन आपुले
नद्या धरणांना शुद्ध ठेवू
पर्यावरणाचा संदेश पसरवूनी
शुद्ध निरोगी भारत घडवू

—राजेंद्र पवार

मोठेपणाची इच्छा हे अहंकार वाढीचं कारण आहे.

भाजीच नव्हे, तर औषधी असलेले कारले...

कारले ही फक्त भाजीच नसून दिव्यौषधीही आहे. कारली छोटी व मोठी अशी दोन प्रकारची असतात. मोठी कारली उन्हाळ्यात तर छोटी कारली पावसाळ्यात येतात. कारले थंड प्रकृतीचे असून, पचनास हलके असते. ते शरीरात वायू वाढवून पचन क्रिया प्रदिप्त करुन पोट साफ करते. कारले खाल्ल्यामुळे त्वचा स्वच्छ होते व कोणतेही पुरळ-फोड होत नाहीत.ते भूक वाढवते, विष्ठा शरीराबाहेर काढते. मूत्रमार्गही साफ ठेवते.

कारल्यामध्ये व्हिटामिन ए जास्त असल्यामुळे ते दृष्टीसाठी अत्युत्तम असते. रातांधळेपणा असल्यास यांच्या पानांच्या रसाचा लेप थोडीशी काळी मिरी मिसळून लावावा.

व्हिटामिन सी जास्त असल्याने हे शरीरात आर्द्रता राखते व तापातही फायदेशीर असते.

कारल्याची भाजी खाल्ल्यास बध्दकोष्ठता कधीही होत नाही. जर एखाद्याला बध्दकोष्ठता असेल, तर तीही नष्ट होते. याद्वारे ॲसिडिटी, छातीतील जळजळ व आंबट ढेकराच्या तक्रारीही दूर होतात. वाढलेले यकृत, प्लीहा व मलेरियाच्या तापातही हे फायदेशीर असते. यासाठी रुग्णाला कारल्याची पाने वा कच्ची कारली वाटून पाण्यात मिसळून पाजली जातात. या प्रयोगाने कावीळही बरी होते. रस काढण्यापूर्वी कारली व पाने स्वच्छ धुवावीत. सांधेदुखी व संधीवातात कारल्याची भाजी कडवटपणा न घालवता सकाळ, दुपार व संध्याकाळ खावी, फोड, पुरळ, रक्तविकार यांसाठी कारल्याचा रस गुणकारी असतो. त्वचा, कुष्टरोग व मुळव्याधीत कारली मिक्सीत वाटून हलक्या हाताने प्रभावित जागी लेप लावावा. हा लेप नियमितपणे रोज रात्री लावावा. कारल्याचा रस चमचाभर साखर मिसळून प्यायल्यास रक्ती मुळव्याधीत फायदा होतो. कारल्याचा रस स्थूलता कमी करण्यासही मदत करतो. तसेच ज्या स्त्रीला मासिक पाळी त्रास व वेदनादायक होतं असेल, तिनेही कारल्याचा रस प्यावा. कारल्याच्या रसाने गर्भवती स्त्रियांमधील दुधाचे प्रमाण वाढते.

शरीराच्या ज्या भागात दाह होत असेल, तिथे कारल्याच्या पानांचा रस चोळावा. मधुमेहासाठी कारली वरदान आहेत. त्यांनी कारली जास्त खावीत. सकाळ-संध्याकाळ कारल्याचा रस प्यायल्यास रक्तातील साखर कमी होते. कारल्याचा रस पोटातील कृमीही नष्ट करतो. लोहाचे प्रमाण जास्त असल्यामुळे रक्ताल्पता (ॲनिमिया) ही दूर करतो.

❖❖❖



विचारपुष्प

दृष्टिकोन

दोन मित्र एका बागेत फिरायला जातात. बागेत फेरफटका मारुन आल्यानंतर त्यांना आणखी एक मित्र भेटतो. तो विचारतो, "तुम्ही दोघं बागेत फिरायला गेला होतात. तिथं तुम्हाला काय अनुभव आला? बाग कशी वाटली?"

पहिला मित्र म्हणाला, "बागेमध्ये प्रवेश केल्याबरोबर सगळीकडे विविध रंगाची अनेक फुलं फुललेली होती. त्यांचा सुगंध सर्वत्र दरवळत होता. ती फुलांची बाग बघून मन अतिशय प्रसन्न झालं." त्यानंतर दुसरा मित्र म्हणाला, "मी बघितलं तेव्हा एका फांदीवर

(पान १२ वर)

एकाचा आधार धरा

एकदा भगवान श्रीकृष्ण भोजन करत होते. रुक्मिणी माता त्यांना प्रेमाने वाढत होती. भोजन करता करता भगवान श्रीकृष्ण अचानक उठले आणि धावतच दरवाजाकडे गेले. नंतर पुन्हा परत येऊन भोजन करायला बसले. तेव्हा रुक्मिणी मातेने विचारले, "प्रभु! भोजन अर्धवट टाकून आपण धावतच कुठे गेला होतात?" तेव्हा भगवान श्रीकृष्ण हसून म्हणाले, "काही नाही, माझ्या एका भक्ताला काही अज्ञानीजन त्रास देत होते. त्यामुळे त्याने मला साद घातली. मी त्याचं रक्षण करण्यासाठी आणि त्या दुष्टांना दंड देण्यासाठी धावलो होतो; परंतु माझ्या प्रिय भक्ताने त्यांना दंड देण्यासाठी एका पहिलवानाकडे मदत मागितली. पहिलवानाने त्या दुष्टांना दम देऊन हाकलून लावले; परंतु भक्ताचे मात्र समाधान झाले नाही. त्याने गावाच्या प्रमुखाकडे तक्रार केली. प्रमुखाने त्याला दुसऱ्या दिवशी निवाडा करु असे आश्वासन दिले; परंतु भक्ताने मात्र हातात दगड घेतला आणि तो स्वतः त्यांना दंड द्यायला निघाला. त्यामुळे मी गप्प बसलो."

एवढे बोलून भगवान श्रीकृष्ण म्हणाले, "हे देवी ज्या ज्या वेळी माझा प्रिय भक्त मला हृदयापासून आळवतो, साद घालतो त्यावेळी मी अप्रत्यक्ष रुपाने त्याच्या सोबत असतो, त्याच्या मदतीला धावतो; परंतु जो भक्त माझ्या वर पूर्ण विश्वास ठेवत नाही, संयम–सहनशीलता बाळगत नाही, स्वतःकडे कर्तृत्व घेतो तेव्हा त्या कर्माचा भागीदार तो स्वतः होतो. अशावेळी मी त्यांच्यामध्ये पडत नाही. कारण प्रत्येक जण कर्म करायला स्वतंत्र आहे. जो भक्त मला समर्पित होऊन माझ्यावर पूर्ण विश्वास ठेवतो तो त्या कर्माचा कर्ता बनत नाही. त्यामुळे त्याला सुखदुःख भोगावे लागत नाही.

मित्रांनो ही कथा वाचल्यानंतर आपल्याला नक्कीच द्रौपदी–वस्त्रहरणाची कथा आठवली असेल. द्रौपदीने देखील वस्त्रहरण होत असताना सगळ्यांकडे मदतीची याचना केली आपल्या बलवान पतींवरही तिचा विश्वास होता. दरबारातील ज्येष्ठ सज्जनांनादेखील तिने हात जोडून विनंती केली; परंतु कोणीही तिला वाचवू शकले नाही. शेवटी भगवान श्रीकृष्णांना जेव्हा ती समर्पित झाली, तेव्हा भगवान श्रीकृष्णांनी तिची लाज राखली. खरं पाहिलं तर भगवान श्रीकृष्ण युगाचा अवतार असून तिला अधिक प्रिय होते. ते तिचे खरे हितचिंतक असतांना तिने इतरांकडे मदतीची आणि आधाराची याचना केली. त्यामुळे सुरुवातीला तिला दुर्योधन आणि दुःशासनाकडून जे दुःख भोगावे लागले ते भोगावे लागले नसते. म्हणून आपण ज्या एकाचा आधार घेतला त्यावर पूर्ण विश्वास ठेवून आलेल्या प्रत्येक परिस्थितीला धैर्याने व संयमाने तोंड दिले पाहिजे. रागाच्या किंवा क्रोधाच्या आवेशात येऊन सद्सद्विवेकबुद्धी विसरुन स्वतः कर्ता बनू नये.

❖❖❖

दृष्टिकोन

(पान १० वरुन)

एक फूल असेल तर तिथं दहा काटे आहेत. फुलांपेक्षा काट्यांचीच संख्या जास्त दिसली."

वस्तु एकच; परंतु दृष्टिकोन मात्र भिन्नभिन्न. आपल्याही मनाची अशीच काही अवस्था असते. म्हणूनच म्हटलंय, 'जशी दृष्टी तशी सृष्टी' आपण कोणाकडे जर सकारात्मक दृष्टीने पाहू, तर सारं काही सकारात्मकच दिसेल. मन जर उदास असेल तर सर्वत्र उदासीनताच दिसू लागेल. मन प्रसन्न असेल तर सगळीकडे प्रसन्नताच दिसून येईल.

सध्याच्या काळामध्ये आपण पाहतो, की अनेक लोक डिप्रेशनने (नैराश्याने) ग्रासलेले आहेत. अशा स्थितीत मनाला स्थिर कसं करणार? कारण त्यांची मनं अशांत आहेत. कुणाला नोकरी नाही. कुठे विदेशात जायचं असेल तर विजा–पासपोर्ट मध्ये काही अडचणी येत आहेत. कुणाच्या इच्छा–आकांक्षा पूर्ण न झाल्यामुळे त्यांची मन दुखावलेली आहेत. अशा परिस्थितीबद्दल प्रभु परमात्म्याला दोष देणं हा मानवी स्वभाव आहे; परंतु परमात्मा तर तिन्ही काळाचं जाणणारा आहे. भूत–भविष्य–वर्तमान सारं काही जाणतो आणि परमात्मा जे आपल्या हिताचं आहे तेच करत असतो. आपण मात्र विनाकारण परमात्म्याला दोष देऊन मोकळे होतो. त्यासाठीच आपल्याला सकारात्मक दृष्टिकोन बाळगला पाहिजे.

मनुष्य जीवनाचा उद्देश इतर योनींपेक्षा वेगळा आहे. पशु, पक्षी, प्राणी, वनस्पती यांच्यापेक्षा मनुष्यप्राणी सर्वात श्रेष्ठ आहे. कारण तो आपल्या मनाचं नातं परमात्म्याशी जोडू शकतो. परमज्ञान प्राप्त करुन आपलं जीवन उत्तम तऱ्हेने जगू शकतो.

❖❖❖

दादाला विचारू या..!

प्रश्न आपल्या मनातले, उत्तर सद्‌गुरु बाबाजींचे

प्रश्न : बंधन म्हणजे काय?

उत्तर : भ्रम आणि अज्ञानात राहणे यालाच बंधन म्हणतात. मी शरीर आहे असे समजणे हा सर्वात मोठा भ्रम आहे. मी शरीर नसून मी शरीरात आहे. जसं, एखादा ड्रायव्हर मी गाडी आहे असं कधीही म्हणत नाही, तर मी गाडीमध्ये आहे असं म्हणतो. तसं, ज्ञानी पुरुष मी देह नसून मी देहात आहे असं म्हणतो. कारण आपण देह नसून आत्मा आहोत. ही समज नसल्याने मनुष्य सुखी–दुःखी होत असतो. इच्छा–कामना पूर्ण करण्यासाठी धडपडत असतो. त्यासाठीच आपला जन्म झाला आहे असे समजतो. असा जीव पुन्हा पुन्हा जन्म घेतो. यालाच बंधन असं म्हटलेलं आहे.

प्रश्न : मुक्ती म्हणजे काय?

उत्तर : कुठल्याही प्रकारच्या इच्छा–वासना–कामना न उरणे म्हणजे मुक्ती. इच्छा–कामना या शरीराशी संबंधित आहेत. पण ज्यावेळी मी देह नसून आत्मा आहे ही समज येते तेव्हा इच्छा कामनेचा प्रभाव कमी होऊ लागतो. हळूहळू त्याचा लय होऊन भक्त आत्मिक स्तरावर जीवन जगू लागतो. थोडक्यात, देहभावातून आत्मभावात येणे म्हणजे मुक्ती.

प्रश्न : ज्ञान कोणाला दिले जाते?

उत्तर : ज्ञान जीवात्म्याच्या मुक्तीसाठी दिले जाते; परंतु ते मनाच्या मार्गाने होते. मनाला जेव्हा या ज्ञानाचं आकलन होतं आणि समर्पित होतं तेव्हा जीवाला मुक्ती प्राप्त होते. म्हणूनच भगवद् गीतेत म्हटले आहे 'मन एवं मनुष्याणाम् कारण बंधमोक्षये' मनाला जर या ज्ञानाची समज आली तर जीव बंधनातून मुक्त होतो. मनाला जर हे ज्ञान, ही आत्मस्वरुपाची ओळख पटली नाही तर जीवाला बंधनात पडून पुन्हा पुन्हा जन्म मरणाच्या चक्रात अडकावे लागते. म्हणजे मन हेच मोक्षाचं कारण आहे आणि बंधनाचंही कारण आहे.

शब्दकोडे २०९

○ पूजा अरोडा (रेवाडी-हरियाणा)



आडवे शब्द

१. आधी पोटोबा, मग .....(म्हण)
२. एक पौष्टिक पालेभाजी
४. या देशाने १९६२ मध्ये भारतावर आक्रमण केले होते
५. हिरा हा ..... या मूळ तत्वापासून बनलेला आहे
७. घरा लगतचे
८. एक ऋतू
९. घटस्थापनेपासूनचा दहावा दिवस
११. आंतरराष्ट्रिय न्यायालय कोठे आहे ? (हेग / पुणे)
१२. या राज्याची राजधानी पाटणा आहे
१४. दादासाहेब फाळके पारितोषिक विजेती पहिली अभिनेत्री :..... राणी
१७. कपडा, वस्त्र याचा समानार्थी शब्द
१८. ५१ चे तीन समान भाग केले तर एक भाग किती ?

उभे शब्द

१. नरेंद्र विश्वनाथ दत्त हे कोणाचे नाव आहे ?
२. १२ जुलै १९६१ रोजी कोणते धरण फुटून जलप्रलय झाला होता ?
३. नाभीमध्ये सुगंध असणारे एक हरिण
६. वर, पती
१०. जागतिक पर्यटन दिवस सप्टेंबर महिन्याच्या ..... तारखेला साजरा करतात.
११. शत्रूच्या गटातील माहिती गुप्तपणे काढणारा
१३. अमेरिकेच्या राष्ट्रपतीचे निवास स्थान : व्हाईट .....
१४. मानला तर ..... नाही तर दगड (म्हण)
१५. पंचेद्रियांपैकी सत्संगात कोणतं इंद्रीय सर्वाधिक जागृत असावे ?
१६. सर्वात कठीण पदार्थ

उत्तरे इतरत्र

वैज्ञानिक प्रश्नोत्तरे

प्रश्न : रेडियम म्हणजे काय ?

उत्तर : रेडियम एक रेडियो ॲक्टिव्ह एलिमेंट वा तत्त्व आहे. प्रत्येक एलिमेंट ॲटम्सपासून तयार होते. बहुतेक ॲटम्स कायमस्वरुपी असतात, म्हणजे ते वर्षानुवर्षे बदलत नाहीत. परंतु काही जड ॲटम्स तुटतात व इतर घटकांमध्ये बदलतात. या तुटण्याला रेडिओ ॲक्टिव्हिटी म्हणतात. प्रत्येक रेडिओ ॲक्टिव्ह एलिमेंट तुटते व आपल्यातून एका निश्चित प्रमाणात किरणे सोडते. हे प्रमाण तीव्र वा सौम्य करता येते, पण तुटण्याची प्रक्रिया माणूस नियंत्रित करु शकत नाही. रेडियमचे तुटणे ते लेड वा शिशात बदलेपर्यंत चालूच राहते. थोडक्यात १५९० वर्षात अर्धा ग्रॅम रेडियम त्या ॲटममध्ये बदलते ज्याचे ॲटॉमिक वजन त्याच्यापेक्षा कमी आहे. यानंतर १५९० वर्षात राहिलेल्या रेडियममध्ये बदल होत जातो तो त्याचे पूर्ण लेडमध्ये रुपांतर होईपर्यंत.

प्रश्न : ग्लोबल वॉर्मिंगचा धोका निर्माण कसा झाला ? का होत आहे ग्लोबल वॉर्मिंग ?

उत्तर : पृथ्वीचे तापमान दिवसेंदिवस वाढत आहे. अंटार्टिका आणि टुंड्रामधील हिमखंड वितळत आहेत. हा वेग जरी कमी असला तरी, पर्यावरणाचे संतुलन बिघडत आहे. तापमान वाढण्याचे नेमके कारण नाही, अनेक कारणांमुळे हे ग्लोबल वॉर्मिंग होत आहे.

एकीकडे अंतराळात विविध शोध लावून मोठमोठे यश संपादन करणाऱ्या मानवाने स्वत:च्या स्वार्थासाठी पर्यावरणाच्या हिताचे कोणतेही काम केलेले नाही. रस्त्यांवरुन धावणाऱ्या गाड्यांनी ज्या वेगाने हवेत कार्बनडाय ऑक्साइड, मिथेन व नायट्रोऑक्साइडचा धूर सोडला, ज्या वेगात वीजप्राप्तीसाठी पॉवर प्लांटस् उभारले. ज्या वेगात वृक्षतोड करुन त्याचा विविध कारणांनी वापर केला, त्यामुळे केवळ पर्यावरणच प्रभावित झाले नसून, ग्रीन हाऊसही यामुळे प्रभावित झाले आहे. ग्रीन हाऊस हे पृथ्वीच्या वातावरणातील सर्वात वरचा व सर्वात महत्त्वाचा भाग आहे. ग्रीन हाऊस सूर्याकडून येणारी अतिनील किरणे, धोकादायक वायूंना पृथ्वीपर्यंत पोहचू देत नाही, त्यांना तो पुन्हा अंतराळात फेकून देतो. यामुळेच पृथ्वीवर जीवसृष्टी टिकून आहे. परंतु वाढत्या गाड्या, औद्योगिकीकरण, शहरीकरण, इलेक्ट्रॉनिक वस्तूंचा वाढता वापर व शेतात रासायनिक खतांच्या अधिक वापरामुळे ग्रीन हाऊस प्रभावित होत आहे. कार्बनडाय ऑक्साइड, मिथेन, नायट्रोऑक्साइडसारख्या घातक वायूंमुळे ग्रीन हाऊसचे तापमान वाढत आहे आणि याचा परिणाम केवळ तापमानातील वाढच नसून समुद्र व हवामान चक्रही पूर्णपणे प्रभावित झाले आहे.

आजोबा

चित्रांकन लेखन, रंग
अजय कालडा

आनंद वनात पिंट्या नावाचं एक माकड राहत होतं. ते फार चंचल आणि घमेंडी होते म्हणून त्याच्यापासून परिसरातील सर्व जनावरं त्याच्यापासून दूर राहणे पसंत करत असत.

एक दिवस पिंट्या खाण्याच्या शोधात जंगलामध्ये इकडे तिकडे फिरत होता. त्याला तिथे एक भले मोठे आंब्याचे झाड दिसले. त्यावर भरपूर आंबे लागले होते. त्या झाडाच्या एका फांदीवर बसून कोकिळा मधूर आवाजात गायन करत होती.

पिंट्याच्या मनात विचार आला की, या झाडावरचे आंबे काही दिवसांनी पिकून तयार होतील. म्हणून आपण इथे राहण्याची सोय केली पाहिजे.
पिंट्या लगेच उड्या मारत आंब्याच्या झाडावर चढला
“बंद कर तुझं हे गाणं, आज पासून हे झाड माझं घर आहे”
“पिंट्या भाऊ मी तर पहिल्यापासून इथेच राहते.”
“मग दाखव तुझं घरटं कुठं आहे ते? सर्वांना माहीत आहे की तू आपली अंडी कावळ्याच्या घरट्यात घालतेस.”

पिंट्याच्या तोंडून असे शब्द ऐकताच कोकिळेला दुःख झाले. नाराज होऊन ती दुसऱ्या झाडावर जाऊन बसली.
“पिंट्या, तू कोकिळेला असं बोलायला नको होतं.”
परंतु पिंट्याला त्याचा काहीच फरक पडला नाही.
“मी काय करावे ते तू मला शिकवू नकोस.”

जंगलातील सर्व प्राणी पिंट्याचे बोलणे ऐकून नाराज झाले.
काही दिवसातच झाडावर आंबे पिकू लागले. पिंट्या आंब्यावर ताव मारु लागला.
काही दिवसात झाडावरचे आंबे पिकून संपले. झाडावरचे आंबे संपले. आता पिंट्या चिंतातूर झाला.
दुसरीकडे बाकिचे प्राणी मजेत इतर झाडांची फळे खात होते.
एके दिवशी भुकेने व्याकूळ झालेला पिंट्या सशाजवळ फळं मागण्यासाठी गेला.
ससुल्याने पिंट्याला आनंदाने पोटभर फळं खायला दिली. पिंट्याला स्वत:ची चूक समजली. त्याला पश्चाताप झाला. कोकिळेशी केलेल्या चुकीच्या व्यवहाराची त्याने ससुल्याजवळ क्षमा मागितली. पिंट्याला समजून चुकले की, आपण सारे मिळून मिसळून राहण्यातच भलाई आहे.
तात्पर्य :- आपण सर्वांनी मिळुन मिसळून राहिले पाहिजे.



कथा

देवाचा निर्णय

राम आणि शाम नावाचे दोन मित्र प्रवासाला निघाले होते. त्याकाळी वाहतुकीची साधनं नसल्याने पायीच प्रवास करावा लागे. दोघेही चालून चालून थकले. दुपारची वेळ असल्याने दोघांनाही भूक लागली. एका वडाच्या झाडाखाली पडीक मंदिर होते. त्या मंदिराच्या पारावर दोघंही विश्रांतीसाठी थांबले. आपापली शिदोरी उघडून खाणार तेवढ्यात एक व्यापारी तिथे येऊन पोहचला. तो म्हणाला, "बंधूंनो, मी पण खूप थकलोय आणि भूकही खूप लागलीय. माझ्याकडे पैसे आहेत; पण खायला काही नाही. मला थोडी भाकर द्याल का?"

दोघा मित्रांनी आपापल्या घरुन आणलेली शिदोरी उघडली. रामकडे तीन भाकरी होत्या. शामकडे पाच भाकरी होत्या. एकूण आठ भाकरी झाल्या. आता या आठ भाकरी तिघांमध्ये सारख्या वाटून कशा खाव्यात? म्हणून मग त्यांनी युक्ती केली. एका भाकरीचे तीन तुकडे असे आठ भाकरींचे

चोवीस तुकडे केले. प्रत्येकाच्या वाट्याला आठ आठ तुकडे आले. भोजन आणि विश्रांती झाल्यानंतर व्यापारी म्हणाला, "मित्रांनो, तुमचे माझ्यावर खूप उपकार झाले; परंतु मलाही तुम्हाला काही भेट द्यायची आहे. माझ्याकडे आठ सोन्याची नाणी आहेत, ती मी तुम्हाला देतो. कृपया त्याचा स्वीकार करा. सोन्याची आठ नाणी देऊन व्यापारी निघून गेला. आता ही नाणी आपसात कशी वाटून घ्यावी? शाम म्हणाला, "आपण निम्मे–निम्मे वाटून घेऊ." त्यावर राम म्हणाला, "नाही शाम, तू पाच भाकरी आणल्या होत्यास म्हणून पाच नाणी तुला आणि मी तीन भाकरी आणल्या होत्या म्हणून तीन नाणी मला. शाम म्हणाला, "नाही नाही आपण दोघे मित्र आहोत समान वाटणी करू या."

त्या दोघांचं संभाषण मंदिरात बसलेले साधु महात्मा ऐकत होते. ते बाहेर येत म्हणाले, "बाळांनो, तुम्ही खरे आणि प्रमाणिक मित्र आहात. मला तुमचं कौतुक वाटतं." हे ऐकून राम म्हणाला, "महात्माजी तुम्हीच सांगा, शामने पाच नाणी घ्यायला हवीत की नाही?" त्यावर महात्मा मंद स्मित करत म्हणाले, "मी निर्णय देण्याआधी देवाला विचारून सांगतो. कारण माझा किंवा तुमचा निर्णय चुकू शकतो, पण देवाचा निर्णय कधीही चुकत नाही," असे म्हणून ते दोन मिनिटं डोळे मिटून ध्यानस्थ बसले. नंतर ते म्हणाले, "ज्याने पाच भाकरी आणल्या होत्या त्याला सात नाणी आणि ज्याने तीन भाकरी आणल्या होत्या त्याला एक नाणं मिळायला हवं." त्यांचा हा निर्णय ऐकून दोघेही त्यांच्याकडे आश्चर्याने पाहत राहिले. महात्मा म्हणाले, "असं आश्चर्याने पाहू नका.हा देवाचा निर्णय आहे.तो कधीही चुकत नाही." मित्रांनो, देवाचा हा निर्णय तुम्हाला योग्य वाटतो का? वर वर जरी तो योग्य वाटत नसला तरी तो योग्य आहे. त्यामागचं तथ्य आपण समजून घेतलं पाहिजे. ते कसं हे पाहू या.

एका भाकरीचे तीन तुकडे या प्रमाणे आठ भाकरींचे चोवीस तुकडे झाले. शामने पाच भाकरी आणल्या होत्या त्यांचे पंधरा तुकडे झाले. त्यापैकी आठ तुकडे त्याने स्वतः खाल्ले आणि सात तुकडे सेवा केली म्हणून त्याला सात नाणी. रामने तीन भाकरी आणल्या, त्यांचे नऊ तुकडे झाले. त्यापैकी आठ तुकडे त्याने स्वतः खाल्ले आणि एक तुकडा सेवा केली म्हणून एक नाणं रामला.

❖❖❖

प्रत्येक युगामध्ये अवतारी महापुरुषांच्या वचनांना मानणारे आणि न मानणारेही होऊन गेले. दोन्ही पैलू नेहमीच पहायला मिळाले. उदा. उजेड होता तसा अंधारही होता, थंडी होती तशी गरमीही होती. मनमतावर चालणारेही होऊन गेले आहेत. ते स्वत:च्या मतावर चालणारे अहंकार, संकुचितवृत्ती आणि स्वार्थाने जगत आले, ज्यामुळे वातावरण दूषित होते.

मार्ग तोच उत्तम आहे जो, प्रभू इच्छेमध्ये राहून समदृष्टीच्या भावनेने युक्त आहे, जो भिंती पाडण्याचे नाही तर उभारण्याचे काम करतो, जो राम आणि रहीममध्ये भेद करत नाही, जो जात-पात, मजहब (धर्म), रंग-वर्ण, प्रांतवाद, देशाच्या सरहद्दीच्या पलिकडे जाऊन 'वसुधैव कुटुंबम्'चीच दृष्टी देतो.

– युगद्रष्टा बाबा हरदेवसिंहजी महाराज

प्रभूप्राप्ती करुन त्याच्याशी एकाकार होणे म्हणजे भक्ती.

मदर तेरेसा

अल्बेनियातील एका खेड्यात २७ ऑगस्ट १९१० रोजी जन्मलेली 'अग्नेस बोयाझिऊ' नावाची मुलगी 'भारतरत्न' या सर्वोच्च राष्ट्रीय आणि 'नोबेल' या सर्वोच्च आंतरराष्ट्रीय पुरस्काराची मानकरी तर ठरलीच पण विशेष म्हणजे दीनदुबळ्यांची ती जगन्माता ठरली. तिच्या विलक्षण प्रवासाची ही कहाणी.

तीन भावंडात सर्वात धाकटी असलेली ॲग्नेस दररोज आईबरोबर चर्चमध्ये प्रार्थनेसाठी जाई. फावल्या वेळात ती इतर मुलींसोबत गरीब वस्त्यांना भेट देई. या मुली आजारी लोकांची सेवाशुश्रूषा करीत. ॲग्निस त्या संघाची सभासद झाली.

पुढे बंगालमधील धर्मगुरूंकडून भारतीय समाज, तेथील जीवनपद्धती याविषयी तिला माहिती मिळत गेली. बंगाल प्रांतातील दीनदुबळ्यांची सेवाकार्य करण्याची प्रबळ इच्छा तिच्या मनात जागृत झाली. आयर्लंडमध्ये इंग्रजी शिक्षण घेऊन ती लॉरेटो या संघाची नन झाली. या वेळी तिचे वय फक्त १८ वर्षे होते.

पुढच्याच वर्षी ॲग्नेस यांना कलकत्त्याला पाठवण्यात आले. कलकत्त्याच्या सेंट मेरी या कान्व्हेंट शाळेत त्या भूगोल शिकवू लागल्या. पुढे तिथेच प्राचार्याही झाल्या. १९ वर्षे त्यांनी शिक्षणदानाचे कार्य केले. या काळात त्यांनी हिंदी आणि बंगाली भाषा शिकून घेतल्या. सुखवस्तू कुटुंबातील मुलांना शिकवण्यापेक्षा गरीब, कुपोषित मुलांना शिकवावे व अनाथ दीन दुःखीतांची सेवा करावी अशी तळमळ लागली. कॉन्व्हेंटमध्ये वास्तव्य करून गोरगरिबांची सेवा करता येणे शक्य नाही याची त्यांना खात्री झाली.

१० सप्टेंबर १९४६ रोजी त्या रेल्वेने दार्जिलिंगला आल्या. त्या प्रवासात त्यांना अंतरात्म्याचा आवाज आला. दीन–दरिद्री अनाथ, अपंग उपेक्षित मुलांच्या सेवेसाठी देव आपल्याला बोलवत आहे हे त्यांना कळून चुकले. लॉरेटो या संघातून रीतसर बाहेर पडून त्यांनी आपले नाव 'तेरेसा' असे धारण केले. तसेच वेशभूषाही बदलली . सर्वात उपेक्षित समजल्या गेलेल्या भंगी समाजातील महिला वापरतात तशी निळ्या किनारीची पांढरी साडी असा वेश धारण केला. पाटणा येथे तीन महिन्यांचा परिचारिकेचा अभ्यासक्रम पूर्ण करून २१ डिसेंबर १९४८ रोजी कलकत्त्याच्या झोपडपट्टीत त्यांनी पहिली शाळा उघडली. पण राहण्यासाठी घर नव्हतं. घर शोधतांना त्यांना खूप भटकावे लागले. कॉन्व्हेंटच्या सोयीसुविधा त्यांना आठवू लागल्या; क्षणभर मन विचलित झालं; परंतु तो मोह आवरत त्यांनी झालेल्या वेदना सहन करण्याची ईश्वराकडे शक्ती मागितली. कलकत्त्याच्या गोम्स कुटुंबाने काही काळ त्यांना आश्रय दिला. ७ ऑक्टोबर १९५० रोजी मदर तेरेसा यांनी नव्या संघाची स्थापना केली. सर्वसंगपरित्याग करून त्यांच्या संघात कार्य करण्यासाठी शेकडो तरुण मुली पुढे आल्या. त्यांना पाच वर्षे धर्मशास्त्र आणि अध्यात्म यांचा अभ्यास करावा लागतो. त्यानंतर ब्रह्मचर्य, अपरिग्रह, आज्ञाधारकपणा आणि आजारी लोकांची सेवा अशी चार तत्वं स्वीकारण्याची दीक्षा दिली जाते. आज ऐंशी राष्ट्रातील चार हजार दीक्षा घेतलेल्या तरुणी एकशे एकोणतीस देशात सेवाकार्य करत आहेत . जगभरात तेरेसा यांचे सहाशे शहात्तर आश्रम असून त्यापैकी दोनशे चौदा आश्रम भारतात आहेत. मदर तेरेसा यांचे महानिर्वाण ५ सप्टेंबर १९९७ रोजी कोलकाता येथे झाले. दिनांक १९ ऑक्टोबर २००३ रोजी त्यांना मरणोत्तर संतपद बहाल करण्यात आले.

❖❖❖

परमात्म्याच्या अनुभूतीसाठी विद्वतेची नाही विश्वासाची गरज आहे.

कथा

एका बाणात दोन शिकार

एका नगरीत राजा यशपाल राज्य करीत होता. तो अतिशय दयाळू आणि प्रजेची काळजी घेणारा होता; परंतु राजपुत्र मात्र थोडासा अहंकारी आणि रागीट स्वभावाचा होता. त्याला शिकारीचा भारी छंद होता. निरनिराळ्या प्राण्यांची–पक्ष्यांची तो रोज शिकार करत असे. त्या निरपराध जीवांची हत्या पाहून राजपुरोहिताला खूप वाईट वाटे. राजानेही राजपुत्राला समजावून पाहिले, पण त्याच्यामध्ये काही सुधारणा झाली नाही.

एके दिवशी राजा यशपाल खूप आजारी पडला. त्याच्या हातापायाला सूज आली होती. राजवैद्यांनी अनेक उपचार केले; पण यश आले नाही. नगरीबाहेर एक साधू महात्मांचा आश्रम होता. त्यांच्याकडे या आजारावर औषध उपलब्ध होते. राजपुरोहिताने त्यांना भेटून सांगितले, की महात्माजी, आपल्याला एकाच बाणात दोन शिकार करायच्या आहेत. साधु महात्मा काय समजायचं ते समजले. त्यांनी राजावर उपचार करायची तयारी दाखवली त्यासोबतच राजपुत्राचं वर्तन देखील त्यांना सुधारायचं होतं. साधुमहात्मा आल्यावर सारे जण राजाभोवती जमले. महात्मा

(पान २५ वर)

फुलं ही चुरगळणाऱ्याच्या पायांनाही सुगंधच देतात.

कथा

सत्याचा आग्रही मोहन

मित्रांनो, मोहन म्हणजे आपले महात्मा गांधी. त्यांच्या बालपणीचा हा प्रसंग आहे. बालपणी मोहन खूप लाजाळू आणि भित्रा होता. त्याला जास्त मित्रही नव्हते. शाळेतून घरी आणि घरातून शाळेत एवढंच त्याला ठाऊक होतं. शाळा सुटली की तो कधी कोणासाठी थांबत नसे. त्याला सतत भीती वाटायची की मुलांनी आपली खोडी काढली किंवा आपल्याला त्रास दिला तर?

मोहनची शाळेमधील वर्तणूक अत्यंत साधी सरळ होती. त्याला शिक्षकांबद्दल नितांत आदर होता. त्यामुळे शाळेत मस्ती करणे तर सोडाच; पण त्याने कधी कुणाची खोडीही कधी काढली नाही.

एकदा मोहनच्या शाळेमध्ये शिक्षण–निरीक्षक शाळा तपासणीसाठी आले होते, त्यांनी प्रत्येक वर्गातील विद्यार्थ्यांच्या इंग्रजी आणि इतर विषयांच्या

ज्ञानाची तपासणी करायला घेतली. ते मोहनच्या वर्गात आले. त्यांनी विद्यार्थ्यांना पाच इंग्रजी शब्द लिहायला सांगितले. मोहननेही पाच इंग्रजी शब्द लिहिले; परंतु कॅटल या शब्दाचं स्पेलिंग चुकीचं लिहिलं होतं. वर्गशिक्षक पाठीमागे उभे राहून पायाने इशारा करुन त्याला स्पेलिंग चुकीचं लिहिलय असं खुणवत होते. इतर विद्यार्थ्यांच्या मागे उभे राहून त्यांचेही चुकीचे स्पेलिंग ते बरोबर करुन घेत होते.

शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी मिळून शिक्षण निरीक्षकाची फसवणूक करणे मोहनला आवडलं नाही. म्हणून त्यांनी आपले शब्द जसेच्या तसेच ठेवले. शेवटी सर्व विद्यार्थ्यांच्या सर्वच शब्दांचे स्पेलिंग बरोबर आले. अपवाद मात्र मोहन ठरला. त्याच्या एका शब्दाचं स्पेलिंग चुकीचं आलं.

शिक्षण निरीक्षक गेल्यावर शिक्षकांनी मोहनला त्याच्या मूर्खपणाबद्दल खूप खडसावले. पण मोहन आपल्या मतावर अत्यंत ठाम होता. अशा पद्धतीने मी खोटं काम करणार नाही आणि कोणाच्या दबावालाही बळी पडणार नाही. त्याचा सत्याचा आग्रह लहानपणापासूनच अत्यंत प्रखर असा होता. बालपणीच त्याच्या वडिलांनी त्याला सत्यवादी राजा हरिश्चंद्र हा चित्रपट दाखवला होता. त्याचाही परिणाम त्याच्या मनावर झालेला होता. याच सत्याग्रहाच्या हत्याराचा वापर त्यांनी स्वातंत्र्यलढ्यासाठी केला आणि ब्रिटिश सरकारला जेरीस आणले होते.

—सुकदेव पाटील

एका बाणात दोन शिकार

(पान २३ वरुन)

म्हणाले, महाराजांचा इलाज होऊ शकतो; पण त्याच्यासाठी एकच औषध आहे ते म्हणजे मांस. राजपुत्र पटकन म्हणाला, एवढंच ना! हे तर खूप सोपं काम आहे. कोणत्या प्राण्याचं मांस आणायचं तेवढं सांगा. मी आत्ता जंगलातील साऱ्या प्राण्यांची शिकार करुन त्यांचं मांस घेऊन येतो. महात्मा म्हणाले, पण त्यांचं मांस इथं उपयोगाचं नाही. इथं दोन तोळे माणसाच्या शरीराचं मांस लागणार आहे आणि तेही जो स्वखुशीने देईल तेच लाभदायक ठरणार आहे. राजपुत्र म्हणाला, ठीक आहे. मी आत्ता घेऊन येतो. राजपुत्र प्रत्येकाकडे गेला, प्रत्येकाला विनवणी करुन सांगू लागला, आपल्या महाराजांची तब्येत ठीक नाहीये. त्यांच्या उपचारासाठी दोन तोळे आपल्या शरीराचं मांस हवय; परंतु कोणीही त्याला आपल्या शरीराचं मांस दिलं नाही. शेवटी उदास आणि हताश होत तो घरी परतला. तेव्हा महात्मा म्हणाले, राजपुत्रा! तुझ्यासाठी तर मांस आणणं अतिशय सोपं काम होतं ना? मग खाली हाताने का परत आलास? राजपुत्र शर्मिंदा होत काही बोलला नाही. महात्मा पुढे म्हणाले, जे निष्पाप, निरपराध आणि प्रतिकार करु शकत नाही अशा प्राण्यांचं मांस तू बळजबरीने घेऊन येतोस; परंतु आज राजावर आपलं प्रेम आहे असं सांगणारे कोणीही आपल्या शरीराचं मांस देत नाहीये. मग त्या मुक्या प्राण्यांची हत्या का बरे करतोयस? जर तू शिकार थांबवली नाहीस तर महाराजांचा आजार कधीच बरा होणार नाही. राजपुत्राने पुन्हा कधीही शिकार न करण्याची शपथ घेतली अशा प्रकारे एकाच बाणात दोन शिकार केली. एक म्हणजे राजाचा आजार बरा झाला आणि राजपुत्रात सुधारणा झाली.

❖❖❖

वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा

अभिज्ञा नेवरेकर

आशिष कुंभार

रुहानी पाटील

पुर्वी म्हाप्रलकर

शिवांश कोंडुस्कर

विघ्नेश पाटील

गार्गी सुतार

श्रेया पाटील

कोमल पवार

स्वरा पिसाळ

सहज कदम

ईश्वरी म्हात्रे

चिन्मयी म्हाप्रलकर

अर्थव पाटील

परमात्म्याला आधी जाणलं पाहिजे

प्रभू परमात्माचं ध्यान स्मरण केल्याने जीवनात आनंद येतो; परंतु ज्याचं स्मरण करायचं आहे त्याला आधीच जाणणं गरजेचं आहे. जोपर्यंत आत्मा मूळ स्वरुपाला जाणत नाही, तर मग ध्यान कुणाचं करेल?

जसं, एखाद्या स्त्रीला मूलबाळ नाही किंवा तिच्या कुशीत मूलच नाही अशा स्त्रीला मातृत्वाचे किती जरी आदेश–उपदेश दिले तरी तिचं ममत्त्व जागृत होणार नाही. मुलाबद्दल प्रेमही वाटणार नाही. त्या मुलाचं एखादं काल्पनिक नाव जरी सांगितलं तरी तिच्या हृदयात त्या काल्पनिक मुलाविषयी मातृत्वाचा भाव निर्माण होणार नाही. जेव्हा प्रत्यक्षात मूल मातेच्या मांडीवर खेळू लागेल, तेव्हा आपोआपच तिला मुलाविषयी प्रेम–वात्सल्य वाटू लागेल आणि ते कायम राहील. अशाप्रकारे हृदयात जोपर्यंत ज्ञानाचा प्रकाश पडत नाही, दिव्यदृष्टी प्राप्त होत नाही तोपर्यंत परमात्म्याशी प्रेम होऊ शकत नाही, ध्यान–स्मरण करता येणार नाही. हा प्रभू–परमात्मा कणाकणात व्यापलेला आहे. सर्व ठिकाणी आहे. हा परमात्मा सत्य आहे. याव्यतिरिक्त कुठलीही गोष्ट सत्य असूच शकत नाही. कारण सत्याचा महत्त्वाचा गुण म्हणजे ते सदैव एकरस असते. कायमस्वरुपी राहणारे असते. सत्याला आदि–अंत नसतो. प्रभू परमात्मा उत्पन्न होत नाही, त्याचा प्रलयही होत नाही. संसारिक पदार्थाप्रमाणे परमात्मा काल वेगळा होता आणि आज वेगळा आहे असं कधीही होत नाही. हा परमात्मा सर्वत्र व्यापलेला आहे. याला ओळखूनच यावर अज्ञानाचा जो पडदा पडलेला आहे, तो दूर होणार आहे. जसं, डोळ्यात मोतीबिंदू झाला तर समोरची वस्तू स्पष्ट दिसत नाही तस अज्ञान अंधकारामुळे प्रभु आपल्याला दिसत नाही. म्हणून हे रहस्य उलगडणारा जाणकार (सद्गुरु) जोपर्यंत भेटत नाही तोपर्यंत परमात्म्याला जाणणं शक्य नाही.

❖❖❖

एस.एस.सी. गुणवंत विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन

श्रीधर सावरटकर
९८.२%

सृष्टी वाळवे
९६.२%

सुशांत भडंगे
९५.४%

श्रद्धा साळवी
९५.२%

स्नेहा शिंदे
९५.२%

सिमरण लोधी
९५%

स्वीकार मांडवकर
९५%

समिक्षा दोरुगडे
९४.४%

अंकित कुमार
९४.४%

मनाली भोईर
९४.२%

मयुरी पाचुपते
९४%

तेजस नंधा
९४%

महेक गुप्ता
९४%

संस्कार व्हणमाने
९३%

सुखदिप देशमुख
९३.६%

अतुल करड
९३%

सौरभ सुंकी
९२.६%

सुदीक्षा बाबर
९२.४%

ईश्वरी शिरवाडकर
९१.६०%

सिमरण पुजारी
९१.४%

सिद्धी जेधे
९१.२%

कशिश लतरे
९१.२%

निहारीका कांबळे
९१%

प्रज्ञा डोंगरे
९०.८%

वेदांत पोर्जे
९०.६%

वृषभ मुकनाक
९०.४%

सुमित साळुंखे
९०.२%

हार्दीक गुंडेकर
९०.२%

मनिषा कालकटे
९०.२%

वैष्णवी चव्हाण
९०.२%

नंदिनी धस्कनवार
९०%

आर्यन जामदार
९०%

करुणा जाधव
८९.६०%

हसा मुलांनो हसा

बन्या : (लाह्या विकणाऱ्याला) काका, या लाह्या वाळूमध्ये एवढ्या तडतड करत का उडत आहेत ?

विक्रेता : तू या वाळूवर थोडा वेळ बसून बघ म्हणजे तुला कळेल हां !

शिक्षक : बाळ्या, तू सांग बरं, एका शेतात शंभर मेंढ्या बसलेल्या आहेत. त्यापैकी पन्नास मेंढ्या उठून गेल्या तर किती मेंढ्या शिल्लक राहिल्या ?

बाळ्या : एकपण नाही.

शिक्षक : काय रे तुला एवढं सोपं गणित येत नाही ?

बाळ्या : मला येतं... पण मेंढरांना कुठं येतं गणित ? एक उठलं की सगळी एकामागोमाग जातात.

एक चिमणी : (शेतात दाणे खात असताना) अगं पळ लवकर, तिथे बघ माणूस उभा आहे.

दुसरी चिमणी : नाही गं, बुजगावणं आहे ते !

पहिली चिमणी : तुला कसं कळलं ?

दुसरी चिमणी : त्याच्या हातात मोबाईल नाहीये.

सुमीचे स्थळ पाहुण्यांना पसंत पडले. मुलाकडचे होकार देणारच होते...
तेवढ्यात किचनमधून सुमीचा आवाज आला

आई, चहासाठी किती शिट्ट्या ?

हे ऐकल्यावर मुलाकडचे तिथे थांबलेच नाहीत.

बेरोजगार व्यक्ती : मालक, तुमची जाहिरात वाचून मी तुमच्याकडे कामाला आलो आहे.

मालक : तुला माझी अट माहीत आहे ना ? तुला पगार न देता फक्त दोन टाईम जेवण मिळेल, चालेल ना ?

व्यक्ती : होय, मालक मला मान्य आहे. पण मला काय काय करायचं आहे ?

मालक : रोज गुरुद्वारात जायचं तिथे दोन टाईम मोफत लंगर (भोजन) दिलं जात. तेव्हा तू रोज दोन माणसांचं भोजन घेऊन यायचं. एक तुझ्यासाठी आणि माझ्यासाठी, कळलं ?

विज्ञानाचे शिक्षक : मुलांनो,माझ्याकडे हा एक रुपयाचा कॉइन आहे. तो मी या ॲसिडमध्ये टाकतो. मला सांगा, तो विरघळणार की नाही ?

बंड्या : नाही विरघळणार !

शिक्षक : बरोब्बर; हे तू कसं ओळखलं ?

बंड्या : सोप्पय सर, जर हे नाणं विरघळणार असतं तर ते तुम्ही आमच्याकडून मागून घेतलं असतं. तुमच्या खिशातलं कशाला टाकलं असतं !

माळशेज घाट

आकाशाला भिडलेल्या उत्तुंग कड्यांवर कोसळणारा मुसळधार पाऊस आणि शुभ्र खळखळत फेसाळत येणारे धबधबे, हिरव्या गालिचांवर हळुवार सरकणाऱ्या दाट ढगांची गर्दी, त्यातून वळणे घेत मध्येच बोगद्यात जाणारा रस्ता हे अनुभवायचे असेल तर नगर–कल्याण रस्त्यावरच्या माळशेज घाटात जायलाच हवे. जिथे घाट रस्ता सुरू होतो तिथे दरीत घुसलेल्या एका पठारावर पर्यटकांच्या सोयीसाठी एमटीडीसीचे रिसॉर्ट आहे. जवळच खुबी गावाजवळ पिंपळगाव धरणाचा सुंदर जलाशय आहे. या घाटाचा घाटमाथ्यावरील भाग पुणे जिल्ह्यात तर घाटातील मुख्य भाग हा ठाणे जिल्ह्यात येतो. पुरातन काळापासून प्रसिद्ध असलेला महाराष्ट्रातील एक घाट.

इथली खासियत म्हणजे 'रोहित पक्षी' इंग्रजीत 'फ्लेमिंगो' म्हणून ओळखले जाणारे हे परदेशी पाहुणे दरवर्षी या जलाशयात येतात. माळशेज हा मुख्य घाट रस्ता असल्याने एसटीच्या बऱ्याच गाड्या पुणे मुंबई होऊन ये–जा करत असतात. स्वतःच्या वाहनाने गेल्यास पुण्याहून एक दिवसाची पावसाळी सहल सहज घडेल.

माळशेज घाटातल्या रेस्ट हाऊसच्या मागे हरिश्चंद्रगडाची उत्तुंग डोंगर रांग पसरली आहे. समोरच्या दरीच्यातळात घनदाट जंगलामुळे येथे ससा, घोरपड, मुंगूस, बिबळ्या अशा वन्य प्राण्यांचा वावर असतो. सैबरियातून येणाऱ्या फ्लेमिंगो पक्षांचे थवे घाटाच्या अलीकडे डोंगरवाडी जवळच्या शेतामध्ये साचलेल्या पाण्यात भक्ष्य टिपायला जुलै ते सप्टेंबर महिन्यात येतात.

पावसाळ्यात माळशेज घाटाकडे जाताना डावीकडे डोंगरात खूप उंचावरून कोसळणारा धबधबा दिसतो. तीन धारांमध्ये कोसळणारा हा धबधबा पाहण्यासाठी फक्त पावसाळ्यातच जावे लागते.

पुण्याहून नारायणगाव मार्गे माळशेज घाटात जाता येते किंवा मुंबईहून कल्याण मुरबाड मार्गे जाता येते.

ठाणे जिल्ह्यातल्या शहापूर वरून किन्हवली सरळगाव मार्गे माळशेज घाटाकडे जाता येते.

राहण्याची सोय :

कल्याण माळशेज रस्त्यावर घाटाच्या पायथ्याशी सावर्डे गावात रस्ता संपतो येथे हॉलिडे रिसॉर्ट झाले आहेत. हॉटेल पाशी गाडी उभी करून पुढे थीदबी गावापर्यंत 3 किलोमीटर कच्चा रस्त्याने चालत जावे लागते. स्थानिक वाटाड्या बरोबर असेल तर धबधब्यापर्यंत जाता येते.

राजांचे प्रयाण

राजे समर्थांना भेटून गेल्यानंतर उद्धव गोसावी म्हणाले, "यावेळी राजे अधिक काळ येथे राहिले. त्यांच्या संभाषणाचा भाव कळला. तेव्हा आता त्यांचा किती अवधी राहिला आहे तो दासला कळावा; परंतु म्लेंछांचा (मुघलांचा) नाश करण्याचा राजांचा संकल्प पूर्ण झाल्याचे दिसत नाही." समर्थ म्हणाले, "कसेही असले तरी संकल्प केला, तो पूर्ण होणारच, शिवबा पुन्हा याच कुलात जन्म घेऊन शत्रूचे निवारण करतील." श्रींचे वास्तव्य येथे आहे म्हणूनच ह्या प्रदेशाला आनंदवनभुवन म्हटले आहे. उद्धव गोसावींनी पुन्हा एकदा विचारले, "राजेश्रींना अजून किती अवधी आहे?" समर्थ म्हणाले, "आजपासून साठाव्या दिवशी राजे स्वर्गस्थ होतील."

शके १६०२ मधील चौत्रशुद्ध १५ रविवार, या दिवशी राजे स्वर्गस्थ झाले. ही बातमी कळताच समर्थ उठून आतल्या

खोलीत गेले. राजांच्या प्रयाणाचे वर्तमान ऐकून त्यांना खूप वाईट वाटले. जिकडे तिकडे उदासीनता भरुन गेली. समर्थ क्वचितच खोलीच्या बाहेर येत. त्यांनी स्वतःला कोंडून घेतले.

एकदा संभाजी महाराज समर्थांच्या दर्शनासाठी सज्जनगडावर आले. त्यावेळी समर्थांनी त्यांना थोडासा उपदेश केला . त्याचा सारांश एवढाच होता, की शिवबा ज्या रीतीने चालले त्या रीतीने चालण्यातच सर्वांचं भलं आहे.

शके १६०३ मार्गशीर्ष महिन्यात कल्याण स्वामी डोमगावहून येऊन समर्थांच्या दर्शनाला आले. यावेळी दासबोधाचा विसावा दशक संपला. कल्याण स्वामींनी पोथी लिहिली होती. समर्थांनी वाचून चुकलेली अक्षरं दुरुस्त केली. ती प्रत आजही डोमगावच्या मठात आहे. थोड्या दिवसानंतर कल्याण स्वामी डोमगावी निघून गेले. त्यावेळेपासून समर्थांनी अन्न वर्ज्य केलं. दूध प्राशन करुन राहत. आपल्या खोलीत कोणी येऊ नये अशी त्यांनी आज्ञा केली. आता दिवसेंदिवस त्यांची प्रकृती बिघडत चालली होती. उद्धव गोसावी म्हणाले, "व्याधी दूर करण्यासाठी चांगले वैद्य बोलवतो." त्यावर समर्थ हसून म्हणाले, "लोकांना आजपर्यंत ज्ञान सांगून आपणच देहावर ममता धरावी? जे होणार ते देहास होतच आहे. आता वैद्याची काही आवश्यकता नाही." असे म्हणून त्यांनी किर्तन करविले. स्वामींचे मुखकमल प्रसन्न व शरीर तेजःपुंज दिसत होते.

आपल्यानंतर ही सेवा उद्धव गोसावी सांभाळतील असे ते म्हणाले. तेव्हा गोसावींनी सांगितले, आक्कांनी(समर्थांची शिष्या) ही सेवा चालवावी; परंतु आक्का हात जोडून म्हणाल्या, या देहाला तो अधिकार नाही, याकरता दुसऱ्या कोणाला सांगावे. शेवटी श्रेष्ठांच्या मुलांना बोलून त्यांच्या हाती सेवा सोपवावी असे सांगितले. त्याच वेळी तंजावरच्या कारागिराकडे चार मूर्ती तयार करायला दिल्या होत्या. त्या मूर्ती तयार झाल्यावर व्यंकोजी राजे यांनी समर्थांकडे पाठवल्या. समर्थांना त्या मूर्ती पाहून खूप आनंद झाला. त्याच दिवशी त्यांनी त्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली.

होता होता माघ वद्य अष्टमीचा दिवस येऊन ठेपला. आता काळ समीप आला आहे हे शिष्य मंडळींनी जाणले. त्या दिवशी रात्रभर भजनाचा गजर झाला. नवमीचा दिवस उजाडला. समर्थ पलंगाखाली उत्तराभिमुख बसले.

स्वामींनी दूधही बंद केले होते. आठ दिवस ते केवळ उपाशीच होते. आक्का म्हणाल्या, सगुण मूर्ती जात आहे, तर भजन कोणाचे करावे? बोलावेसे वाटले तर कोणाशी बोलाव? असे म्हणून रडू लागल्या. त्यावर समर्थ म्हणाले, ज्याला माझ्या पश्चात माझ्याशी बोलावेसे वाटेल त्याने दासबोध इत्यादी ग्रंथ वाचावेत. म्हणजे मी प्रत्यक्ष बोलल्याप्रमाणे आहे. आता कोणीही दुःखी–कष्टी होऊ नये.

क्रमशः

कथा

संस्कारांचं महत्व

ऊन्हातान्हात भटकत राजू शेवटी एका ऑफिसमध्ये पोहोचला. आज तो पहिल्यांदाच मुलाखतीसाठी आला होता. घरातून निघताना तो विचार करत होता की, जर ह्या मुलाखतीत पास झालो तर शहरात नवीन घर घ्यायचं. आई-बाबांची रोजची कटकट, तेच तेच बोलणे. ह्यापासून आपली सुटका होईल. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत त्यांची जी कटकट चालते त्यामुळे खूप वैतागलोय. कंटाळा आलाय मला रोजरोज तेच ऐकून. सकाळी झोपेतून उठलो की आधी अंथरुण पांघरुण घडी करा. निटनेटके ठेवा. मग बाथरुमला जा. बाथरुममधून बाहेर आलो की आई आवाज देते नळ बंद केला का? टॉवेल जागेवर ठेवला की फेकला इकडे तिकडे?

नाश्ता करुन घरातून निघताना पण बाबांचा करडा आवाज, पंखा बंद केलास का? की चालूच आहे? काय काय ऐकायचे? ही नोकरी

मिळली ना तर घर सोडून देईन. विचाराच्या तंद्रीतच तो ऑफिसमध्ये शिरला. ऑफिसमध्ये बरेच उमेदवार मुलाखतीसाठी बॉसच्या बोलवण्याची वाट पाहत बसले होते.

बारा वाजले होते. त्याने पाहिले ऑफिसच्या व्हरांड्यात लाईट अजून चालूच होती. तेवढ्यात आईची आठवण आली. त्याने लगेच जाऊन लाइटचे बटन बंद केले. ऑफिसात ठेवलेले वॉटर कूलरचे पाणी थेंब थेंब गळत होते. बाबांचे रागवणे आठवले. आणि लगेच त्याने वॉटर कूलरचा कॉक व्यवस्थित बंद केला. पुढे निघाला तर एक खुर्ची रस्त्यातच होती ती बाजूला ठेवली आणि वर गेला. बघतो तर एकएक उमेदवार मुलाखतीला आत जातो व लगेच बाहेर येतो. त्याने माहिती काढली तेव्हा त्याला काळलं की बॉस फाईल घेतात काही न विचारताच बाहेर पाठवून देतात. राजूचा नंबर आल्यावर त्याने मॅनेजरकडे फाईल सरकवली. कागदपत्रांवर नजर टाकत त्यांनी राजूला विचारले, "केव्हा कामावर हजर होणार आहेस?" त्यांच्या ह्या प्रश्नाने तो आश्चर्यचकीत झाला. त्याला वाटलं ते चेष्टा करत आहेत. ते त्याच्याकडे बघत म्हणाले, "ही चेष्टा नाहीये, खरंच विचारतोय."

"आजच्या मुलाखतीत मी कोणालाही काही विचारले नाही. फक्त सी.सी.टी.व्ही. मध्ये प्रत्येकाचे वागणे आणि हालचाली बघीतल्या. सर्वजण आले; पण कोणीही नळ व लाईट बंद केली नाही. धन्य आहेस तू आणि तुझे आईवडील, ज्यांनी तुला इतके छान संस्कार लावले आहेत.

खरं म्हणजे ज्या माणसाला स्वत:लाच शिस्त नाही भलेही तो हुशार व चतुर असला तरी व्यवस्थापन आणि जीवनाच्या धावपळीत तो कधीच यशस्वी होऊ शकत नाही." राजू भारावल्यासारखा घरी पोहचला. आईबाबांना त्याने कडकडून मिठी मारली आणि त्यांची क्षमा मागत त्यांना धन्यवाद दिले. आईबाबांना कळेना. राजूने त्यांना सगळी हकीकत सविस्तर सांगत म्हटले, "आई-बाबा तुम्ही मला छोट्या छोट्या गोष्टींसाठी रागावलात, चिडलात पण त्यामुळे मी जे शिकलो त्याच्या बदल्यात माझ्या पदवीची काहीच किंमत नव्हती. तेव्हा कळलं की नुसतं शिक्षण आणि पदवी असून चालत नाही तर जीवनात सभ्यता आणि संस्कारही खूप आवश्यक आहेत."

मित्रांनो, या जगात जीवन जगण्यासाठी संस्कार गरजेचे आहेत. संस्कारासाठी आई-वडिलांचा आदर सत्कार करणं हेही तेवढंच महत्वाच आहे.

- रश्मी थोरात

किट्टी

चित्रांकन व लेखन :
अजय कालडा

बरोबर बोललीस तू किट्टी बेटा! मुलांनो, स्वच्छतेमुळे आपले तन आणि मन दोन्ही निर्मळ होतात आणि स्वच्छ राहतात. तसेच परिसरातील वातावरण ही शुध्द राहते.
स्वच्छ भारत अ
स्वच्छ
भारत
मॅडम, मी तर आपले घर अंगण तसेच आजूबाजूचा परिसर स्वच्छ ठेवण्याकडे विशेष लक्ष देते.
शाब्बास किट्टी ! मुलांनो, तुम्हाला सर्वांनाच माहीत आहे की आपले सरकार तसेच अनेक संस्था आपला देश स्वच्छ बनविण्यासाठी या अभियानात सामील होत आहेत.

हो मॅडम, मी टी.व्ही. वर याचा प्रचारसुध्दा पाहिला आहे. लोक झाडू घेऊन रस्त्यावरील कचरा काढताना स्वच्छता अभियानाचा प्रचार करत होते.

बरोबर आहे तुझं किट्टी. मुलांनो, आपण सर्वांनी ही गोष्ट स्वीकारली पाहिजे. कारण भारत आपला देश आहे. येथील प्रत्येक रस्ता व गल्ली-बोळ स्वच्छ करणे आपले कर्तव्य आहे.

बरोबर आहे तुमचं मॅडम !

हो मॅडम आम्ही सुध्दा या अभियानात सामील होऊन साफसफाई करु

फारचं छान मुलांनो ! आता पासून तुमचे सर्वांचे कर्तव्य आहे की, आपल्या आसपास कचरा जमा होऊ द्यायचा नाही. नेहमी कचराकुंडीचा वापर करायचा आहे. आणि हेही ध्यानात ठेवा की, कोणी आजूबाजूला घाण करत असेल तर त्याला मनाई केली पाहीजे.

मॅडम, याबरोबरच आम्ही आमच्या वस्तीत जाऊन लोकांना या स्वच्छतेचे काय फायदे आहेत ते सांगू.
खूप खूप छान मुलांनो, तसे पहायला गेलं तर स्वच्छतेमुळे आपण निरोगी राहतो. घाणीमुळे आजारपण येते.
बरोबर आहे मॅडम स्वच्छता असेल तर आपण निरोगी राहू.

संत नरहरी सोनार

नरहरी सोनार नावाचे एक महान शिवभक्त पंढरपुरात राहत होते. श्रीशंकराची आराधना करुन त्यांनी त्यांना प्रसन्न करुन घेतले होते. ते पंढरपुरात राहत असूनही विठ्ठलाच्या मंदिरात कधीही गेले नाहीत. त्यांची श्रद्धा फक्त श्री शंकरावरच होती. त्या व्यतिरिक्त ते कोणत्याही देव–दैवताची पूजा करत नव्हते.

एके दिवशी एका सावकाराने विठ्ठलाला नवस केला की जर मला पुत्र झाला तर मी तुला सोन्याचा करगोटा घालीन. पुढे त्या सावकाराला पुत्र झाला. नवस फेडण्यासाठी तो पंढरपुरात आला. सोन्याचा करगोटा बनवून देणारा कुशल सोनार पंढरपुरात आहे का याबद्दल चौकशी केली असता लोकांनी त्याला नरहरी सोनाराचे नाव सांगितले. सावकार नरहरी सोनारांकडे गेला. त्यांना रत्नजडित सोन्याचा करगोटा तयार करायला सांगितला. ते सावकाराला म्हणाले, "तुम्ही आधी विठ्ठलाच्या कमरेचं मोजमाप घेऊन या, म्हणजे मी त्या प्रमाणे करगोटा तयार करुन देतो." सावकाराने विठ्ठलाच्या कमरेचं मोजमाप आणून दिलं.

करगोटा तयार झाल्यावर सावकार विठ्ठलाच्या कमरेस बांधू लागला; परंतु तो अपुरा पडू लागला. सावकार पुन्हा नरहरी सोनारांकडे आला आणि करगोटा थोडा वाढवून घेतला; परंतु आता मात्र तो खूपच सैल होऊ लागला. असे बरेच वेळा झाले. करगोटा विठ्ठलाच्या कमरेस ठीक बसतच नव्हता. शेवटी सावकार नरहरी सोनारांना म्हणाला, "तुम्ही स्वतः देवळात येऊन देवाच्या कमरेला करगोटा बसवून द्या." नरहरी सोनार म्हणाले, "मी श्रीशंकराशिवाय दुसऱ्या कोणत्याही दैवताकडे पाहतही नाही." शेवटी सावकाराने एक मार्ग काढला, तो म्हणाला, "मी तुमच्या डोळ्यावर पट्टी बांधतो म्हणजे तुम्हाला विठ्ठलाचं दर्शन होणार नाही." सावकाराने नरहरी सोनारांच्या डोळ्यावर पट्टी बांधून त्यांचा

स्वत:ची चूक कबूल करणे हा मनाचा मोठेपणा आहे.

हात धरुन त्यांना विठ्ठलाच्या मंदिरात नेलं. नरहरी सोनार मंदिरात गेल्यावर विठ्ठलाच्या मूर्तीला हाताने चाचपून पाहू लागले. विठ्ठलाच्या जागी त्यांना श्रीशंकर असल्याचे जाणवू लागले. ते पटकन म्हणाले, "हे तर माझंच आराध्यदैवत आहे!" असे म्हणून त्यांनी डोळ्यांची पट्टी काढली. तर समोर विठ्ठलाची मूर्ती! नरहरी सोनारांनी पुन्हा डोळे झाकून घेतले आणि विठ्ठलाची मूर्ती चाचपून पाहिली तर त्यांना पुन्हा पुन्हा श्री शंकराचीच मूर्ती असल्याचे जाणवू लागले. शेवटी विठ्ठलापुढे साष्टांग नमस्कार घालत ते म्हणाले, "देवा! मी चुकलो. मी द्वैतभाव धारण केला. श्रीशंकर आणि तुझ्यामध्ये भेद केला. वास्तविक तूच सर्वत्र व्यापलेला आहेस." असे म्हणून त्यांनी डोळ्याची पट्टी काढून टाकली आणि विठ्ठलाच्या कमरेला करगोटा बांधला आता तो अगदी बरोबर बसला.

आपल्या लाडक्या भक्ताचं अज्ञान दूर करण्यासाठी देवाला ही लीला करावी लागली.

❖❖❖

परमपिता परमात्म्याला जाणल्यानेच विश्वशांती संभव आहे. महापुरुषांच्या, गुरुंच्या, अवतारांच्या पदचिन्हांवरुन चालल्याने कल्याण संभव आहे. मानवतेला आध्यात्माच्या आधारेच वाचवले जाऊ शकते.

जी वाणी मानवाला मानवाशी जोडण्याचे कार्य करते, माणसाच्या मनात एकदुसऱ्या विषयी प्रेम निर्माण करते, बंधू-भाव आणि नम्रतेची भावना प्रगट करते तीच खरी वाणी आहे.

कविता

श्रावण सरी

सर सर सरी श्रावण सरी
अंग–अंग सारे ओलेचिंब करी

सर सर सर येई अंगावर काटा
मोकळ्या झाल्या भावनांच्या वाटा

हिरवा शालू पहा नेसली वनराई
तेणे सुखावली माझी धरणीमाई

विसावली पाखरं उंच झाडावरती
भिजलेल्या पंखांनी किलबिल करती

तुडुंब भरल्या, नद्या तळी विहिरी
आनंदून गेला माझा राजा शेतकरी

ऊन–पावसाचा सुरू झाला खेळ
इंद्रधनुष्याचा हा बसलाय मेळ

सण–उत्सवांची सरबराई झाली
लहान थोर सारी आनंदात न्हाली

✍मनीषा साळुंखे, मीरा रोड

कथा

विचारपूर्वक कर्म करा

श्री शंकर व पार्वतीमाता भ्रमंती करत असताना त्यांना एका सरोवरात काही मुलं पोहताना दिसली. ती सर्व मुलं आनंदाने पोहत होती; परंतु सरोवराच्या काठावर एक मुलगा उदास चेहऱ्याने उभा होता. पार्वती मातेने विचारले, हा मुलगा एवढा उदास आणि दुःखी का दिसतोय? भगवान शंकर म्हणाले, सर्व मुलं आनंदाने पोहत आहेत; पण त्या मुलाला हात नसल्याने तो पोहू शकत नाही, म्हणून तो दुःखी आहे. तेव्हा पार्वती मातेला त्याची दया आली, माता म्हणाली, प्रभू! तुम्ही तुमच्या शक्तीने त्याला हात का देत नाही? त्याचं दुःख मला पाहवत नाही. भगवान शंकर म्हणाले, हे पार्वती! प्रत्येक जीव आपापल्या कर्मानुसार सुखदुःख भोगत असतो. मी स्वतः विधीच्या विधानात हस्तक्षेप करत नाही. मुळातच प्रत्येक जीव हा परमपिता परमात्माचा अंश आहे. तो मुळतच शुद्ध, पवित्र

(पान ४६ वर)

ध्येयाचा ध्यास असलाच की प्रयत्नांचा त्रास वाटत नाही.

कथा

झाडूवाला राजा

खूप खूप वर्षापूर्वीची ही गोष्ट आहे. गोपूर नावाचा एक संपन्न देश होता. त्या देशात धीरोदत्त नावाचा एक न्यायी व धर्मपरायण राजा राज्य करत होता. हे राज्य भगवान जगन्नाथाचे आहे असे मानून तो राज्यकारभार पाहात असे. दर वर्षी आषाढ महिन्यात होणाऱ्या जगन्नाथाच्या रथयात्रेच्या वेळी आजूबाजूच्या राज्यातील हजारो भाविक मोठ्या भक्तिभावाने त्या नगरीत येत. त्यावेळी राजा स्वतः रथाची वाट झाडून स्वच्छ करीत असे. एकदा रथयात्रेच्या वेळी राजा झाडू घेऊन रथाचा मार्ग झाडत असताना मद्र देशाच्या राजकन्येने राजाला पाहिले.

काही दिवसांनी त्या राजकन्येचा विवाह आयोजित करण्याचे ठरले. अनेक राजे त्या सुस्वरुप राजकन्येशी विवाह करण्यासाठी उत्सुक होते. राजा धीरोदात्तदेखील त्या राजकन्येला मागणी घालायला गेला. त्याला

आकशातील चमकत्या ताऱ्यांप्रमाणे जगण्याचे स्वप्न ठेवा.

राजकन्या मनापासून आवडली होती. तिच्याशीच लग्न करायचा त्याचा निश्चय होता; परंतु तिने राजाला स्पष्ट सांगितले, की मी झाडूवाल्या राजाशी लग्न करणार नाही. या गोष्टीचे राजाला वाईट वाटले. त्याने मद्र देशावर स्वारी करुन मद्रनरेशचा पराभव केला व राजकन्येला कैद करुन राज्यात आणले. राजकन्येने केलेल्या अपमानाबद्दल तिचे लग्न खऱ्याखुऱ्या झाडूवाल्याबरोबर लावून द्यावे असा त्याने प्रधानाला आदेश दिला. प्रधान बुद्धिमान व विचारी होता. त्याने राजकन्येला सन्मानाने आपल्या घरी आणले. राजा धीरोदात्त कसा सद्‌गुणी आहे हे तिला पटवून दिले. काही दिवस वेश बदलून तिला राजाचे निरीक्षण करायला सांगितले. तेव्हा तिलाही ते पटले. तिला राजाबद्दल आपुलकी आणि प्रेम वाटू लागले. आपण केलेल्या अपमानाबद्दल राजाची माफी मागावी असे तिला मनापासून वाटत होते; पण प्रधानाने तिला योग्य वेळ येईपर्यंत थांबण्याचा सल्ला दिला.

आषाढ महिना आला रथयात्रेच्या वेळी राजा मार्ग झाडत होता. त्यावेळी प्रधान राजकन्येला घेऊन पुढे आला व तिचा हात राजाच्या हाती देत म्हणाला, "महाराज, तुमच्या आदेशाप्रमाणे हिचा विवाह मी एका झाडूवाल्याशी लावून देत आहे. आपल्यापेक्षा योग्य झाडूवाला हिला दुसरा कुठे मिळणार? म्हणून आपण हिचा स्वीकार करावा." प्रधानाच्या बुद्धिचातुर्याचे राजाला कौतुक वाटले. राजकन्येबद्दलचा राग तर कधीच मावळला होता. त्याने मोठ्या प्रेमाने तिचा स्वीकार केला. पुढे विवाह करुन तो सुखाने राज्य करु लागला.

❖❖❖

विचारपूर्वक कर्म करा

(पान ४४ वरुन)

व आनंद स्वरुप असाच आहे; परंतु देह धारण केल्यानंतर त्या जीवाकडून जशी कर्म घडतात तसे दुःख जीवाला भोगावे लागते. तेव्हा आपण प्रभू–परमात्म्याच्या विधानामध्ये ढवळाढवळ न करणे हेच उत्तम! तरीही पार्वती मातेने हट्ट केला आणि त्या मुलाला हात द्यायला भाग पाडले.

काही काळानंतर श्रीशंकर व माता पार्वती दोघेही विहार करत त्या सरोवराकाठी आले. तेव्हा त्यांना असं दृश्य दिसल, की त्या सरोवरात एकच मुलगा पोहत होता; ज्याला प्रभूने दया भावनेने हात दिले होते. बाकीची मुलं काठावर उभी होती आणि पाण्यात उतरण्यासाठी गयावया करत होती; परंतु पाण्यात पोहत असलेला तो मुलगा दांडगाई करत होता. पाण्यात उतरणाऱ्या मुलाचे पाय ओढून त्यांना पाण्यात बुडवत होता. त्यामुळे मुलं घाबरुन काठावर उभी होती. ते दृश्य पाहून भगवान शंकर पार्वती मातेला म्हणाले, पाहिलंस, प्रभूच्या प्रत्येक कृतीमागे काहीतरी रहस्य असतं ते! या मुलाने हात मिळाल्याबद्दल परमात्म्याला धन्यवाद न देता त्याचा उपयोग इतरांना त्रास देण्यासाठीच केला. मागील जन्मीही त्याने अशीच कर्म केली होती त्यामुळे त्याच्या वाट्याला ते दुःख आले होते. प्रत्येक जीवाला आपलं दुःख भोग भोगूनच संपवावे लागते. म्हणून प्रत्येक जीवाने कर्म करताना आधीच खूप विचारपूर्वक करावे. प्रत्येक कर्माचं फळ जीवाला मिळतच असतं. ते तो कधीच टाळू शकत नाही.

(साभार)

सामान्य ज्ञान

१) सहा ऑगस्ट हा दिवस जपानमध्ये कोणता दिवस म्हणून साजरा केला जातो?
अ) समता दिवस ब) काळा दिवस क) हिरोशिमा दिवस क) शांती दिवस

2) लोकमान्य टिळकांनी सुरु केलेले मराठा हे वृत्तपत्र कोणत्या भाषेत होते?
अ) मराठी ब) इंग्रजी क) हिंदी ड) संस्कृत

३) रामायणातील सुमित्रा ही कोणाची आई होती?
अ) रामाची ब) लक्ष्मणाची क) भरताची ड) लक्ष्मण व शत्रुघ्नची

४) पानिपत हे युद्धक्षेत्र कोणत्या राज्यात आहे?
अ) हरियाणा ब) पंजाब क) मध्य प्रदेश ड) उत्तराखंड

५) मूळशंकर हे नाव कोणत्या महापुरुषाचे नाव होते?
अ) स्वामी विवेकानंद ब) स्वामी दयानंद सरस्वती
क) स्वामी रामकृष्ण परमहंस ड) स्वामी रामतीर्थ

६) टेलिस्कोप द्वारा शोधलेला पहिला ग्रह कोणता?
अ) बुध ब) गुरु क) युरेनस ड) नेपच्यून

७) तेरेखोल नदी कोणत्या राज्याची सीमा दर्शवते?
अ) कर्नाटक ब) गोवा क) मध्य प्रदेश ड) पंजाब

८) ऐतिहासिक मुलुखमैदान तोफ कोठे आहे?
अ) मुरुड ब) दौलताबाद क) भोपाळ ड) विजापूर

९) सूर्य व पृथ्वी यांच्यामधील अंतर किती किलोमीटर आहे?
अ)१४ कोटी ब) १५ कोटी क) १६ कोटी ड) १७ कोटी.

१०) तिरंगा ध्वजावरील अशोक चक्रामध्ये किती आऱ्या (रेषा) असतात?
अ) २२ ब) २३ क) २४ ड) २१

उत्तरे इतरत्र

स्वामी विवेकानंदांच्या जीवनातील प्रेरक प्रसंग

नृत्यांगनेकडून शिकवण

स्वामी विवेकानंद १८९१ मध्ये माऊंट अबूला भेट देऊन खेत्रीच्या महाराजांकडे आले. तेथे यजमान म्हणून काही दिवस थांबले. महाराजांसोबत धार्मिक आध्यात्मिक गोष्टींची चर्चा करण्यात दोन तीन दिवस निघून गेले. एके दिवशी महाराजांनी सायंकाळी विरंगुळा म्हणून प्रसिध्द नृत्यांगनेच्या गायनाची बैठक राजवाड्यात आयोजित केली. त्या दिवशी स्वामीजी राजपरिवारातील अजितसिंहांच्या राजवाड्यात पाहुणचाराला गेले होते. स्वामीजींनाही या बैठकीला येण्यासाठी आमंत्रित केले; परंतु स्वामीजींनी बैठकीला उपस्थित राहण्यास नकार दिला आणि अशा बैठकींना संन्याशांनी उपस्थित राहणे शोभत नाही असा निरोप पाठवला.

ही बातमी नृत्यांगनेला समजल्यावर तिला अतोनात दुःख झालं. तिला वाटलं, आपल्या या नृत्य–गायन व्यवसायामुळे स्वामीजींचं दर्शन आपल्याला होऊ शकत नाही. काही क्षणातच तिने संत सूरदासजींचं सुंदर भजन गायला सुरुवात केली. तिच्या सुमधुर आवाजातील स्वरांनी संध्याकाळचं शांत वातावरण भक्तिमय झालं होतं. तिच्या आवाजात आर्तता आणि व्याकूळता होती. तिच्या हृदयीच्या भावना स्वामीजींच्या कानापर्यंत पोहचत होत्या. "हे ईश्वरा! माझा चरितार्थाचा व्यवसाय आणि माझ्यातील दुर्गुण यावरून तू माझी पारख करू नकोस, तू तर समदृष्टी आहेस ना? मंदिरातील मूर्तीतही लोखंडच असतं आणि रणांगणावर लढणाऱ्या सैन्याच्या हातातील तलवारीतही लोखंडच असतं.... पण दोघांना परिसाचा स्पर्श झाला तर त्यांचं रूपांतर सोन्यातच होतं ना? हे देवा, तू तर प्रत्येकामध्ये आहेस, प्रत्येक वस्तूंमध्ये भरलेला आहेस. मग माझे अवगुण पाहून मला दूर का लोटतोस?"

या भजनातील भावार्थाने स्वामीजींचं मन विषण्ण झालं. पश्चातापाने गहिवरून आलं. अपराधीपणाने ते स्वतःचाच धिक्कार करु लागले. असा कसा रे तू संन्यासी! अजूनही तुला स्त्री–पुरुष भेद दिसतोय? स्त्रियांमध्ये ईश्वराचं रूप दिसू नये? या भजनाने मात्र स्वामीजींच्या मनाचं पूर्ण परिवर्तन झालं. त्यांना नवीन धडा मिळाला. नंतर मात्र स्वामीजी त्या संगीत बैठकीमध्ये सामील झाले. त्यांनी तिच्याकडून खूप सारी भजनं तल्लीनतेनं श्रवण केली. शेवटी तिचा निरोप घेताना ते तिला म्हणाले, "माते, मला क्षमा कर, माझ्याकडून नकळत तुझा अनादर झाला."

तिला पुन्हा वंदन करून स्वामीजी मार्गस्थ झाले.

संग्राहक : सुकदेव पाटील

कुठलीही समस्या फार काळ टिकत नाही.

एकांतप्रिय कराकरा

कराकरा हा गरुड पक्ष्याच्या प्रजातीतील पक्षी. दक्षिण अमेरिकतील हा महत्वाचा पक्षी असून सध्या मात्र नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. त्यांचा नैसर्गिक अधिवास नष्ट होत असल्यानेच या पक्ष्यांची संख्या कमी होत असल्याचं संशोधकांचे मत आहे.

साधारण ४९ ते ५८ सेंटीमीटर लांबीच्या या पक्ष्याचं वजन ८०० ते १३०० ग्रॅम इतकं असतं. साधारण दिसणारा हा पक्षी काळ्या-पांढऱ्या रंगसंगतीत असतो. याच्या गळ्याकडील भाग पांढरा असून त्यावर काळ्या रंगाचे ठिपके दिसून येतात. याची जाड व बळकट चोच वैशिष्ट्यपूर्ण असते. या चोचीच्या मागील बाजूस पिवळ्या रंगाचं आवरण असतं. तसेच फांदीवरील पकड मजबूत व्हावी, याकरता अनुकूल अशी पायांच्या बोटांची रचना असते. मैदानी पठार, विरळ झाडंझुडपं असलेला प्रदेश, नारळाच्या बागा याठिकाणी यांचे वास्तव्य दिसून येते. उंदीर, घुशी, साप, कासव, छोटे पक्षी, बेडूक, खेकडे हे कराकराचं मुख्य खाद्य असून तो मृत प्राणीदेखील खातो.कधी कधी इतर शिकारी पक्ष्यांनी विशेषत: गिधाडांनी पकडलेलं भक्ष्य तो पळवतो. हा एकांतप्रिय पक्षी क्वचित तीन ते पाच पक्ष्यांच्या समूहात आढळतो. तसंच जर याला मुबलक प्रमाणात खाद्य सापडल्यास तो इतर कराकरांना वर्दी देऊन बोलवतो आणि ते एकत्रितपणे त्या खाद्याचा फडशा पाडतात. डिसेंबर ते मे हा कराकराचा प्रजनन काळ असतो. या काळात नर व मादी मिळून झाडावर किंवा जमिनीत खोल ठिकाणी घरटं बांधतात. मात्र हे घरटं फारसं व्यवस्थित बांधलेलं नसतं. या घरट्यात मादी अंडी घालते. २८ ते ३२ दिवस अंडी उबवल्यानतंर पिल्लं बाहेर येतात व साधारण एक महिन्यानतंर उडण्यास सक्षम होतात.

संग्राहक - अंकित जाधव

रंग भरा



सामान्यज्ञान उत्तरे

१. क
२. ब
३. ड
४. अ
५. ब
६. क
७. ब
८. ड
९. ब
१०. क

२००९

१वि	ठो	बा		२पा	ल	३क
वे			४ची	न		स्तू
५का	र्ब	६न		७शे	जा	री
नं		८व	सं	त		मृ
९द	१०स	रा			११हे	ग
	त्ता		१२बि	१३हा	र	
१४दे	वी	१५का		ऊ		१६हि
१७व	स	न		१८स	त	रा

।। तू ही निरंकार ।।

पूर्ण सद्गुरु निजभक्तांची सारी संकटे दूर करी।
पूर्ण सद्गुरु निजभक्तांवर कृपा दृष्टी उपकार करी।
पूर्ण सद्गुरु भक्त जनांची पापे सारी नष्ट करी।

पूर्ण सद्गुरु निजभक्तांची सर्व सुखाने झोळी भरी।
पूर्ण सद्गुरु निजभक्तांवर आले संकट दूर करी।
पूर्ण सद्गुरु भक्त जनांचे दुःख तापही दूर करी।

शंकरराव जाधव
मुखी, वाई तालुका

महालक्ष्मी

सर्वांसाठी... सर्वकाही...
एकाच ठिकाणी...

लग्न बस्त्याची
खास सोय !

अविनाश शंकरराव जाधव
प्रचारक, सातारा झोन

THE COMPLETE FAMILY SHOWROOM

मनमोहक साडया । ड्रेस मटेरिअल । मेन्स वेअर । चिल्ड्रन्स वेअर । लेडीज वेअर । सुटींग शर्टींग । रेमण्ड सियारामचे विक्रेते

ऐ मन मेरे सुमिरण कर ले सुमिरण से सुख आयेगा। घेरेंगे न संकट तुझ को भवसागर तर जायेगा।
दम दम पल छिन नाम का जो जन करता अमृत पान है। ऐसे जन को जग में सन्तो मिलता जीवन दान है।

गुरू का जो यशगान करेगा यश दुनिया में पायेगा।
उसकी भी महिमा होगी जो गुरू की महिमा गायेगा।

गुरू की जैं जैं जो करता हैं उसकी होती जैं जैं कार।
गुरू की पूजा जो करता हैं उसको पूजे कुल संसार।

१९९, हरिहरेश्वर प्रतिक, आय.डी.बी.आय.बँक शेजारी, ब्राह्मणशाही, वाई (जि.सातारा)
फोन नं. : 9766727262 / 8999859073

RNI No. MAH/MAR/2004/15105
Postal Regd. No. MCE/78/2022-2024
WPP Licence No. MR/TECH/WPP-164/East/2022-24
Publishing date on 1st of every month
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office,
Mumbai-400001 on dated 1st of every month

॥ तुही निरंकार ॥

ऑफिस : गाळा नं. १,४,६,८ महावीर इंडस्ट्रियल इस्टेट,
नारिंगी फाटा, विरार (पूर्व),
ता. पालघर, जि. ठाणे - ४०१३०५ (महाराष्ट्र)
कार्यालय : (०२५०) २५२७३२०/९८२२८८५५२६
ई-मेल : rajinustries2010@yahoo.in
janardanpatil6500@gmail.com
वेबसाईट : www.vijayaengineeringworks.com
www.rajindustries.net.in

जनार्दन एच्. पाटील
झोनल प्रमुख-नाशिक क्षेत्र

मे. विजया इंजिनिअरींग वर्क्स

मॅन्यु : स्पेशालिस्ट प्लास्टिक
इंजेक्शन मोल्ड आणि ब्लो मोल्ड
(घेर ओरम टाईप डाईज)

मे. राज इंडस्ट्रीज

मॅन्यु. फार्मास्यूटिकल्स कॅप्स (कोलॅप्सीबल आणि लॅमी ट्युब कॅप्स),
पेस्टीसाईड पॅकेजींग, एच.डी. आणि पी.पी. बॉटल

बाबाजी कंस्ट्रक्शन कं.

सिडको आणि सरकारमान्य प्राप्त १ रुम हॉल किचन, २ रुम हॉल किचन
दुकानाचे गाळे तसेच इन्डस्ट्रीअल गाळे कर्ज सुविधांसहित योग्य भावात मिळतील.

जनार्दन ह्. पाटील
अंचित ज. पाटील

राकेश च. पाटील
कुशल रा. पाटील